# महाराष्ट्र शासन

क्र. एनजीसी ३५९८/नमवि/(०१/९८)/मशि-३,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १९ ऑगस्ट, १९९८

प्रति,
कुलसचिव,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगांव - ४२५ ००१.

**विषय :- सन १९९८-९९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.**

संदर्भ : उपकुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचे क्र. उमवि/५/शै-२३/९८५३/९७, दि २३.१२.९७ चे पत्र.

महोदय,

सन १९९८-९९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत आपल्या विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांचा विचार करुन खाली नमूद केलेल्या संस्थेस त्या समोर दर्शविलेल्या ठिकाणी व दर्शविलेल्या विद्याशाखेचे नवीन महाविद्यालय सुरु करण्यास महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम ८२ (५) च्या परंतुकान्वये संस्था स्थानिक असून तेथील उच्च शिक्षणाची वाढती गरज विचारात घेऊन सन १९९८-९९ या शैक्षणिक वर्षापासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे. :-

| संस्थेचे नाव | ठिकाण | विद्याशाखा |
|---|---|---|
| त्रिमुर्ती शिक्षण संस्था, साक्री, जि. धुळे | साक्री, जि. धुळे | कला व विज्ञान |

१) सदर महाविद्यालयास देण्यात आलेली परवानगी सध्या विना अनुदान तत्वावर असून, शासन निर्णय क्रमांक एनजीसी २०९१/(३५६७)/विशि-२अ, दिनांक ८.८.१९९१ अन्वये लागू करण्यात आलेल्या अनुदान सूत्रानुसार व वेळोवेळी निर्गमित करण्यात येणा-या अनुदान संदर्भातील शासन निर्णयाच्या अटींच्या अधिन राहून या महाविद्यालयांना अनुदान तत्वावर आणण्याचा यथावकाश विचार करण्यात येईल.

(कृपया मागे पहा.)

Scanned by CarbonScanner

२) या महाविद्यालयास ज्या विद्याशाखा सुरु करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे, त्या प्रत्येक विद्याशाखेच्या त्रिवर्षीय पदवी परीक्षेच्या पहिल्या वर्षाच्या वर्गात खाली दर्शविल्याप्रमाणे विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तरच वर्ग सन १९९८-९९ पासून सुरु करावा.

| | |
|---|---|
| अ) शहरी विभाग | ६० |
| ब) आदिवासी विभाग | ४० |
| क) ग्रामीण विभाग | ५० |
| ड) महिला महाविद्यालय | ५० |

तसेच, सन १९९८-९९ या शैक्षणिक वर्षाच्या शेवटी होणा-या प्रथम वर्षाच्या विद्यापीठ परीक्षेत कमीत कमी खालीलप्रमाणे विद्यार्थी बसणे आवश्यक आहे. :-

| | |
|---|---|
| अ) शहरी विभाग | ५० |
| ब) आदिवासी विभाग | ३० |
| क) ग्रामीण विभाग | ४० |
| ड) महिला विभाग | ४० |

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम ८३ मधील तरतुदीनुसार संलग्नीकरणाबाबत योग्य ती कार्यवाही विद्यापीठाने तात्काळ करावी व पूर्तता अहवाल संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांना अग्रेषित करावा.

आपला विश्वासू,

(म. अ. सरपोतदार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत -**

१) शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) विभागीय सह संचालक (उ.शि.), जळगाव विभाग, जळगांव.
३) अध्यक्ष/सचिव, त्रिमुर्ती शिक्षण संस्था, साक्री, जि. धुळे.
४) खाजगी सचिव, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) खाजगी सचिव, मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
६) खाजगी सचिव (मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण )
७) खाजगी सचिव (राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण )
८) स्वीय सहाय्यक (अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण)
९) निवड नस्ती मशि-३.

Scanned by CarbonScanner